ठाणेवैभव

# माझे नेत्रालय

## डॉ. गाडगीळ नेत्र चिकित्सालयात टेरीजिअमवर सुयोग्य उपचार

टेरीजिअम हा वैद्यकीय भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ असा की डोळ्यामध्ये त्रिकोणी असा पडदा तयार होतो. हा पडदा कंजंक्टिवा टिश्यूच्या अतिवृद्धीने तयार होतो. टेरिजिअमचा प्रभाव भारतात सुमारे 10 ते 12 टक्के आहे. हा ग्रामीण भागात अधिक प्रमाणात आढळतो. टेरिजिअम होण्याची बरीच कारणे आहेत. त्यात उष्ण कोरडे हवामान, धुळीचे वातावरण, अशा परिस्थितींच्या संपर्कात वाढलेला वेळ तसेच काही वेळा अनुवांशिक कारणे देखील असू शकतात. टेरिजिअममुळे होणारा त्रास म्हणजे डोळ्यात पाणी येणे, डोळा लालसर दिसणे, डोळ्याला खाज येणे, जळजळ होणे आणि नजर धूसर होणे. टेरिजीअमच्या उपचारामध्ये ड्रॉप्स आणि औषधांचा वापर लक्षणे कमी करण्यासाठी केला जातो. लालसरपणा, डोळ्यात पाणी येणे अशा लक्षणांसाठी औषधांमुळे तात्पुरता आराम मिळतो. परंतु जेव्हा टेरिजिअमची वाढ होऊन तो कॉर्नियावर पसरतो. जेव्हा नजर कमी होईल तेव्हा अशा केसेससाठी शस्त्रक्रिया आवश्यक असते. टेरिजिअम कोणालाही होऊ शकते. ज्या व्यक्तीला सूर्यप्रकाश आणि धूळ यांचा बराच वेळ संसर्ग होण्याची शक्यता असते. अशांनी काळजी घ्यावी. पारंपारिक पद्धतीने टेरिजिअम शस्त्रक्रिया केल्यावर देखील पुन्हा वाढण्याचा धोका हा असतोच. हा धोका कमी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर होतो. यामध्ये कंजंक्टिवा ऑटोग्राफ किंवा ॲम्नीओटीक मेम्ब्रेन ग्राफ्ट वापरता येतो. या प्रक्रियेसाठी स्टिच फ्री म्हणजे एक विशेष प्रकारचा फिब्रीन ग्ल्यु देखील वापरता येतो. या सर्व प्रगत शस्त्रक्रियेसाठी कॅशलेस सुविधा उपलब्ध आहेत. ही सुविधा डॉ. गाडगीळ नेत्र चिकित्सालयात उपलब्ध आहे. येथील उपचार सखुबाई चाफोकानडे यांनी घेतली. त्यांच्या डोळ्यातील बुबुळावर पांढऱ्या रंगाचा पडदा येऊन धूसर दिसत होते. त्यावर शस्त्रक्रिया करून अवघ्या काही दिवसातच त्यांना स्पष्ट दिसू लागले आहे. त्यासाठी त्यांनी डॉ. गाडगीळ नेत्र चिकित्सालयाचे आभार मानले आहेत.



रुग्ण
**सखुबाई चाफोकानडे**

**डॉ गाडगीळ आय हॉस्पिटल आणि लासिक लेझर सेंटर**
पहिला मजला, पॅरेडाईस टॉवर, आलोक हॉटेल समोर, मॅकडोनाल्डच्या बाजूला गोखले रोड, ठाणे (प)
वेळ :- दुपारी 12 ते सायंकाळी 8

- Cashless facility available -

**डॉ गाडगीळ आय हॉस्पिटल**
दुसरा रो हाऊस, श्रेयस अपार्टमेंट, हनुमान डेअरी जवळ रामचंद्र नगर, ठाणे (प) वेळ : सकाळी 10-12

E-mail : drgadgileyehospital94@gmail.com
Website : www.drgadgileyeclinic.com I https://drgadgileyeclinic.net

**Mobile No. 98200 17487 I 9820003756 I 9820004756**
Vista care Specialized Clinic Abu Dhabi Unit of Gadgil Eye Hospital